हेमाडे, श्रीनिवास (२०१६): "'समकालीन' तेची संकल्पना : भारतीय संदर्भात तात्त्विक पुनरावलोकनाची गरज" , *आकलन*, वर्ष २, अंक २. जानेवारी-मार्च, २०१६, पाने ०१-१२, ISSN-2394-2177
संपादक : रंगराव भोंगले, हिल-व्ह्यू. कॉ-ऑप हौ. सो. २०ब/१०२, बिम्बिसार नगर, गोरेगाव(पू), मुंबई ६५, मूल्य : रु ६०/-

# 'समकालीन' तेची संकल्पना : भारतीय संदर्भात तात्त्विक पुनरावलोकनाची गरज

श्रीनिवास हेमाडे
shriniwas.sh@gmail.com



'समकालीन' ही संकल्पना आपण इंग्रजीतील 'कॉंटिम्पररी' (Contemporary) या अर्थाने वापरतो. समकालीन असण्याचा मुद्दा बहुतेक सर्व मराठी साहित्यिक, लेखक, नाटककार, कवी, टीकाकार, समीक्षक, साक्षेपी संपादक आणि साक्षेपी प्रकाशक यांनी चर्चेच्या अग्रक्रमी ठेवला आहे. या साऱ्यांनी विशेषतः लेखक मंडळींनी आधुनिकतावाद, आधुनिकोत्तरतावाद, देशीवाद, नवनैतिकता, वास्तववाद इत्यादी संकल्पना मांडल्या. समकालीन किंवा समकालीनता हा 'आजचा समकालीन' मुद्दा आहे !? या साऱ्यांची बरीच चर्चा झाली आहे आणि होही आहे. या संदर्भात' समकालीन 'ही संकल्पना तपासली पाहिजे.

प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की 'समकालीन' ही जाणिव भारतीय नाही, ती आयात आहे. तिला सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञानाचा संदर्भ आहे. व्यापक अर्थाने तिचे स्वरूप तत्त्वज्ञानात्मक आहे. म्हणजे संकल्पना म्हणून ती तत्त्वज्ञानात्मक आहेच पण उपयोजन म्हणूनही ती स्वरूपाने तत्त्वज्ञानात्मक आहे.एखादी संकल्पना प्रत्यक्ष उपयोगात आणली जात असताना तिचे मूळ स्वरूप आणि तिचे उपयोजन कसे होते, यात मला रस आहे.

## उगम आणि इतिहास

Contemporary हा शब्द १७ व्या शतकातील, मध्ययुगीन लॅटीनमधील contemporarius पासून बनतो. Con म्हणजे एकत्र आणि tempus, tempor म्हणजे काळ. यातील Tempus हा लॅटीन तर tempor हा इंग्लीश शब्द आहे. दोन्हीचा अर्थ (time) म्हणजे वेळ, काळ. म्हणून Contemporary म्हणजे एका काळात (सर्वांनी) असणे. या शब्दाची इतर रूपे म्हणजे contemporaneus आणि contemporalis. एकूण अर्थ "ज्या काळात आहात त्या काळाशी सुसंगत असणे".

अन्य व्युत्पत्तिनुसार लॅटीन com म्हणजे with – (सह) + temporarius = contemporarius असा शब्द बनतो. विशेषण म्हणून १६३० च्या दरम्यान contemporarius हा शब्द वापरात आला. १८६६ पासून modern (ज्यास आपण 'आधुनिक' म्हणू) किंवा characteristic of the present (विद्यमान काळाची लक्षणे असा अर्थ प्रचलित झाला. नाम म्हणून १६३० ला "जो दुसरे इतर लोक राहतात तसे त्याच काळात राहातो तो cotemporary" (one who lives at the same time as another) असा अर्थ आला. येथे co- + temporary असा विग्रह केला जातो. १५७० च्या दरम्यान 'स्थानिक वेळ पाळणाऱ्याची जागा घेणे' (Replacing native time-fellow ) म्हणजे त्याच्या पुढे जाणे असा cotemporary चा अर्थ असावा.[1]

हेमाडे, श्रीनिवास (२०१६): "'समकालीन' तेची संकल्पना : भारतीय संदर्भात तात्त्विक पुनरावलोकनाची गरज" , *आकलन*, वर्ष २, अंक २. जानेवारी-मार्च, २०१६, पाने ०१-१२, ISSN-2394-2177
संपादक : रंगराव भोंगले, हिल-व्ह्यू. कॉ-ऑप हौ. सो. २०ब/१०२, बिम्बिसार नगर, गोरेगाव(पू), मुंबई ६५, मूल्य : रु ६०/-



इतर इंग्रजी शब्द असे : coexistent, concurrent, simultaneous, coeval. Coincident म्हणजे एकाच काळात घडणे अथवा अस्तित्वात असणे. Contemporary हा व्यक्ती, तिच्या कृती अथवा तिचा सहभाग, कामगिरी. जसे शिवाजी आणि औरंगजेब हे राजे एकाच काळात होते पण दोघांची कामगिरी वेगवेगळी होती. Contemporaneous हा शब्द बहुधा घटनांसाठी उपयोजिला जातो. जसे की वाफेचे इंजिन आणि औद्योगिक तेच उदय समकालीन- एकाच काळातील घटना आहेत. Coeval हा शब्द दीर्घकाल- अतिदीर्घकाल या अर्थाने म्हणजे नक्षत्रांचे अंतर मोजण्याचा निकष, मानवी कालखंड, युग, सहस्त्रक या कल्पना; विशेषतः संस्कृतीच्या (civilization) अस्तित्वात असण्याचा कालखंड व्यक्त करण्यासाठी हा शब्द वापरला जातो (या संस्कृतीत माणसाने व्यक्त केलेली बौद्धिकतेचे आविष्कार स्पष्ट करण्याच्या संदर्भात विशिष्ट अर्थाने Coeval उपयोगात येतो.) Coincident म्हणजे एका काळातील घटना पण त्यांचा एकमेकांशी संबंध नसणे किंवा त्या घटना घडण्यामागील कारणे अज्ञात राहाणे, हा अर्थ बहुधा १९२० दरम्यान प्रचलित झाला असावा.[2] बोलीइंग्रजीत "modern" आणि "contemporary" हे दोन्ही शब्द समानार्थी उपयोगात आणले जातात.

## जागतिक व भारतीय कल्पना

काल सूचक प्रसिद्ध संज्ञा म्हणजे युग. ही संकल्पना जगातील बहुद्तेक सर्व संस्कृती आणि धर्मात आढळते. युग म्हणजे काळ, परिस्थिती इत्यादींचा विचार करता वेगळे व महत्त्वाचे स्थान असणारा कालखंड.[3] "युग ही काळानुसार बदलणाऱ्या मानवादींच्या अवस्था, विशिष्ट कालखंड, कालपरिमाण इ . दर्शविण्यासाठी जगातील विविध संस्कृतींमध्ये वापरली जाणारी कालगणनेच्या क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण संकल्पना (आहे) .[4]

## युगविषयक जागतिक कल्पना

"अमरत्व वा दीर्घायुष्य, ईश्वरसान्निध्य, सुखातिशय, अधर्माचा व दुर्गुणांचा अभाव इत्यादींनी युक्त असलेले पूर्वीचे सुवर्णयुग आता उरले नाही", अशा अर्थाच्या पुराणकथा जगातील इतर अनेक समाजांमध्येही आढळतात. ग्रहगोलांच्या गतींवर आधारलेली युगकल्पना बॅबिलनमध्ये होती. वर्तमानयुगापूर्वी चार युगे होऊन गेली आहेत, असे मेक्सिकोमध्ये मानले जाते. ग्रीकांच्या व त्यांना अनुसरून रोमनांच्या मते सुवर्ण, रौप्य, ब्राँझ (वा पितळ) आणि लोह असा युगांचा क्रम असून लोहयुगानंतर पुन्हा सुवर्णयुग असे कालचक्र असते. पारशी धर्मामध्ये युगांच्या चक्राकार गतीची कल्पना नाही. अहुर मज्दाने [5] जरथुश्त्राला चार युगांचे प्रतीक असलेल्या सुवर्ण, रौप्य, पोलाद व लोह यांच्या चार फांद्या असलेला वृक्ष दाखविला होता. ख्रिस्ती धर्मातील सेंट ऑगस्टीन वगैरेंनी सात युगे मानली आहेत.[6]

## भारतीय काल कल्पना

भारतीय कालकल्पना दोन प्रकारची आहे. पहिली पौराणिक आणि दुसरी दार्शनिक. पुराणे कधी निर्माण झाली, ती किती आहेत, कोणती, त्यांचे नेमके स्वरूप काय, त्याचे लेखक कोण हे सारे वादग्रस्त आहे. दर्शनांच्या संदर्भात काही आडाखे बांधता येतील. पण तेही अंदाज पंचे धागव दुरसे !

कालक्रमानुसार पौराणिक आधी आणि दर्शने नंतर अशी मांडणी करता येईल. पुराणे अद्‌भुत, अचाट, थक्क करणारी वर्णने आणि विविध प्रकारचे दावे करतात तर दर्शने ही सुव्यवस्थित वैचारिक तार्किक रचना आहेत. दर्शन रचणे इत्यादी गोष्टींसाठी श्रम, वेळ, चिंतन, मनन, सततची तपासणी, पुनर्विचार इत्यादींची गरज असते, म्हणून ती पुराणांनंतर विकसित झाली असे मानता येईल.(अर्थात हेही तितके खरे नाही. उदाहरणार्थ 'समकालीन' या अर्थाने 'आज', भारतीय दर्शनविद्या प्रगत आणि चिकित्सक टप्प्यावर असूनही गेल्या तीस वर्षात दर्शनांना न जुमानता 'संतोषीमाता' सारख्या नव्या देवता नव्याने जन्माला येतात, त्यांचे पुराणीकरणही होते.)

## पौराणिक कालकल्पना

वैदिक साहित्यात स्मृती, पुराणे इत्यादींचा समावेश होतो. कालकल्पना मुख्यतः 'सूर्यसिद्धान्त' या ग्रंथात मांडली गेली आहे.[7] या ग्रंथात दोन प्रकारचा काल सांगितला आहे. पहिला काल हा स्वरूपाने अखंड असणारा आणि प्राणिमात्रांना दंड देणारा ('काळ आता होता पण वेळ आली नव्हती' मधला काल) आणि दुसरा काल, कलनात्मक म्हणजे मोजता येणारा काल. दंड देणारा काल, ही देवता आहे, असे कुठे म्हंटलेले नाही. पण असा दंडक काल मान्य केलेला आहे. मोजता येणारा काल युग, महायुग इत्यादी परिभाषेत मांडला जातो.

कालसंकल्पना 'सूर्यसिद्धान्त' या ग्रंथाप्रमाणे निर्णयसिंधु[8], धर्मसिंधु[9] या ग्रंथातही स्पष्ट केलेली आढळते. 'निर्णयसिंधु' मध्ये वर्ष, आयन, ऋतु, मास, पक्ष आणि दिवस ही संकल्पना मांडली आहे. ही मानवी कालकल्पना आहे.

हा दुसरा मोजता येणारा काल 'युग-महायुग' या परिभाषेत मुख्यत्वे करून पुराणांमध्ये मांडला आहे. पुराणकथांनी सरळरेषेतील कालगती न स्वीकारता चक्राकार कालगतीची संकल्पना मांडली आहे. कृत, त्रेता, द्वापर व कली अशी चार युगे मानली आहेत. कलियुगातनंतर पुन्हा नव्याने कृतादी युगांचा क्रम सुरू होतो. ही चक्राकार कालगती असल्याने तिला आदि आणि अंत नाही ! चक्राकार कालगतीची संकल्पना भारतीय व ग्रीक पुराणकथांचे एक खास वैशिष्ट्य आहे.[10] श्रीमद्भगवद्गीतेतील 'संभवामि युगे युगे' फेम युग ते हेच युग आहे, असे दिसते.

या 'युग' संकल्पनेनुसार आजचे युग हे कलियुग आहे आणि त्याचा काळ ४,३२,००० (अक्षरी चार लाख बत्तीस हजार वर्षे फक्त) आहे आणि त्यातील आत्ता कुठे केवळ ५००० (अक्षरी पाच हजार वर्षे फक्त) संपली आहेत ! (हुश्श !!) त्यात पुन्हा 'महायुग' ही आणखी एक संकल्पना आहे. पुन्हा दैवीयुग आणि मानुषयुग अशीही संकल्पना आहे. 'समकालीन' संकल्पनेच्या संदर्भात एवढी दमछाक पुरे [11].

## दार्शनिक कालकल्पना

प्राचीन भारतीय साहित्य वैदिक आणि अवैदिक अशा दोन प्रकारचे आहे. जे वेद मानतात, स्वीकारतात ते वैदिक आणि जे स्वीकारत नाहीत ते अवैदिक. ही अर्थातच वैदिकांनी केलेली वर्गवारी आहे.

अवैदिकात बौद्ध, जैन आणि चार्वाक अशी तीन दर्शने आहेत. चार्वाक दर्शन वैदिक विरोधक आहेच पण बौद्ध व जैन दर्शनाचेही विरोधक आहे. म्हणून एका अर्थाने ते या वर्गवारीच्या बाहेरचे, स्वतंत्र दर्जा असणारे दर्शन आहे.

**अ) वैदिक :**

वैदिकात अद्वैत वेदान्त (उत्तर मीमांसा), पूर्वमीमांसा, सांख्य,योग,न्याय व वैशेषिक अशी सहा दर्शने आहेत. बहुतेक सर्व दर्शनांनी कालाचा विचार केला आहे. काहीजणांनी तो स्वीकारला, काहीजणांनी नाकारला. ज्यांनी स्वीकारला त्यांनी तो 'ज्ञानाची वस्तू' म्हणून मान्य केला. प्रस्तुत 'समकालीन' या संकल्पनेच्या संदर्भात या साऱ्या दार्शनिक खोलात जाऊन काहीच उपयोग नाही.

तथापि अद्वैतवेदान्त दर्शन मात्र भक्ति संप्रदाय आणि इतर कारणांनी प्रभावी ठरला. कथा, प्रवचने, कीर्तने इत्यादी माध्यमातून आणि काही समाज सुधारकांनी तो स्वीकारल्यामुळे मुख्य प्रवाहात सतत झिरपत राहिला. उदाहरणार्थ ब्राह्मो समाज किंवा म. गांधी यांनी त्यांच्या साऱ्या चळवळीचा आधार मोक्ष हाच मानला, वेदान्त स्वीकारला.

ब) **अवैदिक :**

बौद्ध धर्मानुसार युगांचा क्रम कलियुग ते कृतयुग व पुन्हा कृतयुग ते कलियुग असा असल्यामुळे महायुगात आठ युगे असतात. जैन धर्मानुसार काल हे बारा आऱ्याचे म्हणजे युगांचे एक चक्र असून त्या चक्राच्या उतरत्या भागाला अवसर्पिणी व चढत्या भागाला उत्सर्पिणी म्हणतात. अवसर्पिणीत येणारी सहा युगेच उलट्या क्रमाने उत्सर्पिणीत येतात.[12] वैदिकांच्या संसर्गामुळे बहुधा अशा अचाट कल्पनांचा शिरकाव या धर्मात झाला असावा, असा अंदाज करता येतो.

**क) चार्वाक : 'सद्यकाल' हाच 'समकाल'**

चार्वाकांची काल कल्पना त्यातातल्या त्यात आपण ज्या समकालीनत्वाचा विचार करू पाहतो, त्याच्या जवळ जाणारी आहे. ते आत्ताचा क्षण महत्वाचा मानतात. काम आणि अर्थ हे दोनच पुरुषार्थ ते स्वीकारतात आणि धर्म आणि मोक्ष या कल्पना नाकारतात. जन्म, पुनर्जन्म, आत्मा, कर्मसिद्धान्त इत्यादींनी लादला जाणारा विस्तारीत काल, दंडक काल ते धिक्कारतात आणि 'सद्यकाल' हाच 'समकाल' अशी भूमिका मांडतात, असे आपण म्हणू शकतो.

**चिकित्सा**

भारतात युग ही संज्ञा घटनांच्या काळाचा बोध करून देण्यासाठी वापरली जात असली, तरी या (म्हणजे कालगणनेच्या) बाबतीत ती फारशी उपयुक्त ठरत नाही .कारण, पुराणकथात्मक आणि ऐतिहासिक अशा दोन्ही प्रकारच्या घटनांचे वर्णन करताना युग ही एकच संज्ञा वापरण्यात आली आहे. युग या संज्ञेने नेमका किती वर्षांचा कालावधी सूचित होतो, याविषयी अनिश्चितता आहे; काळाच्या ओघात या संज्ञेचा अर्थ बदलत गेला आहे; तसेच, पुराणांच्या अतिशयोक्ती करण्याच्या प्रवृत्तीमुळेही अर्थबोधात अडचण निर्माण झाली आहे.[13]

युग हा मुख्यत्वे विशिष्ट कालखंड दर्शविणारा, तर महायुग हा कालपरिमाण दर्शविणारा शब्द ठरतो. युग या संज्ञेने नेमका किती वर्षांचा कालावधी सूचित होतो, याविषयी अनिश्चितता आहे. *काळाच्या ओघात* या संज्ञेचा अर्थ बदलत गेला. तसेच, पुराणांच्या अतिशयोक्ती करण्याच्या प्रवृत्तीमुळेही अर्थबोधात अडचण निर्माण झाली आहे, असे डॉ. आ. ह. साळुंखे नमूद करतात.

दप्तरींच्या मते *ऋग्वेदा* पासूनच (१०·७२·२; ५·५२·४) दैवयुग व मानुषयुग अशा दोन पद्धती रूढ होत्या. परंतु पुढे त्यांच्या भिन्नतेची जाणीव राहिली नाही आणि मानुष पद्धतीने सांगितलेल्या इतिहासास दैवी पद्धत लावल्यामुळे घोटाळा झाला. ज्योतिषात ग्रहगती सांगताना आणि तत्त्वज्ञानात जगदुत्पत्तिलय सांगताना दैवयुगांचा उपयोग केला जात होता; तर इतिहासात मानुषयुगाचा उपयोग केला जात होता. पूर्वी चार वर्षांचेच युग चालू होते; परंतु चंद्रसूर्य गतींचा मेळ घालण्यासाठी वेदांगज्योतिषाने (इ. स. पू. सु. १४००) पाच वर्षांचे युग ही कल्पना केली होती, अशी मते दप्तरींनी मांडली आहेत, अशी पुस्ती डॉ. आ. ह. साळुंखे जोडतात.

**पां. वा. काणे यांचे मत**

भारतरत्न म. म. पां. वा. काणे यांच्या मते, "प्राचीन वेदकाळात आणि उपनिषदांसारख्या वेदग्रंथांच्या रचनेच्या काळापर्यंतदेखील कृत, त्रेता, द्वापर व कली हे शब्द, सृष्टीच्या निरनिराळ्या कालखंडांना अनुलक्षून वापरण्यात येत नसत.' 'एकूणच 'युग आणि कल्प' या कल्पनांचा उद्भव ख्रिस्तपूर्व चौथ्या अथवा तिसऱ्या शतकात झाला असावा आणि त्या कल्पना (फक्त) ख्रिस्ती सनाच्या आरंभीच्या शतकांमध्ये पूर्णपणे प्रस्थापित होईपर्यंत त्यात अनेक फेरबदल होत गेले असले पाहिजेत.' याचा अर्थ असा होतो की, या युगकल्पना वेदरचित्या ऋषिमुनींनी सांगितलेल्या नसून त्या गोष्टीबहाद्दर स्मृतिपुराणकारांनी रचलेल्या कल्पना आहेत."[14]

'युग' संकल्पनेचे स्वरूप लक्षात घेतले तर 'समकालीन' असे काही नसते, 'समकालीन' ही संकल्पना थेट मोडीत निघते. म्हणून, हे सारे असो, म्हणजेच नसो !!

आपल्याला उपयुक्त आहे तो सामाजिक दृष्टीने मोजता येणारा काल. त्यास आपण 'सामाजिक काल' म्हणू.

**सामाजिक काल**

सामाजिक काल म्हणजे व्यक्ती व समाज ज्या काळात जगत असतात तो काल. या कालखंडात जी राजकीय व सामाजिक व्यवस्था असते, तिचा ते भाग असतात. ती व्यवस्था त्यांच्या सद्यकालीन जीवनाची चौकट असते, तो काल हा त्यांचा सामाजिक काल होय, असे मी समजतो. या कालात असणे, त्या कालानुरूप मांडणी करणे म्हणजे समकालीन असणे. आता या 'समकालीन' संज्ञेचा, त्याच्या अर्थाचा विस्तार केला तर संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होईल .तो विस्तार पुढीलप्रमाणे :

"समकालीन 'याचा अर्थ जो कुणी ज्या काळात जगत असतो, त्या प्रत्येकाने त्याच्या अस्तित्वात असण्याच्या कालखंडात त्या कालखंडातील विचारविश्वाशी वैचारिकदृष्ट्या, तात्त्विकदृष्ट्या आणि नैतिकदृष्ट्या नाते राखून असणे". या नात्याचे स्वरूप काय असेल ?

तर याचे काही टप्पे पुढीलप्रमाणे सांगता येतील :

1. **आत्मभान :** *आपण आपल्याच काळात जगत आहोत*, भूतकाळात नाही आणि दिलेल्या विद्यमान काळाच्या चौकटीत राहून भविष्याची आखणी करण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत, याचे भान स्वतःमध्ये विकसित करणे, यास 'समकालीनत्वाची जाणिव' म्हणता येईल.
2. **माझा समकाल :** आता, माझा समकाल कोणता ? तर "मी सध्या म्हणजे १९४७ नंतरच्या आणि पुढेही आज एकविसाव्या शतकात भारतात लोकशाही समाजवादी इहवादी देशात राहातो आहे, या समाजव्यवस्थेची मूल्यव्यवस्था स्वातंत्र्य, समता, बंधुता, समृद्धी या मूल्यांनी बनलेली आहे; ती वर्ण-जाति-लिंगभेद न मानणारी, कोणत्याही प्रकारचे शोषण न करणारी आहे आणि मला ती बंधनकारक आहे" हा माझा काल आहे. हे माझ्या काळाचे स्वरूप आहे. इथे माझी जन्मतारीख ते माझी मूल्यव्यवस्था घडविणारी समाजव्यवस्था यांच्या उगम मला गृहीत धरला पाहिजे. यात गतकालाचा, पण फार प्राचीन नव्हे तर नजीकच्या गतकालाचा समावेश होईल. म्हणजे माझा जन्मकाल ते मी अस्तित्वात असण्याचा काल. ज्येष्ठ लेखक सतीश तांबे यांच्या भाषेत, " समकालीनामध्ये काही गोष्टी गतकालीन म्हणजे पारंपरिक, तर काही काळाच्या पुढच्या, तर काही सार्वकालिक/त्रिकालाबाधित अशा असतात. थोडक्यात समकालीनांमध्ये सर्व काळांतील गोष्टींची सरमिसळ असते. त्यामुळे निखळ 'समकालीन' म्हणजे नव्यानं अवतरलेलं आणि रुळलेलं जे काही असेल ते ! घटित समकालीन तर जाणीवही समकालीन असते.[15]
3. **पुरावे देणे :** माझ्यात 'समकालीनत्वाची जाणिव' आहे, मी 'समकालीन' आहे एवढे म्हणून चालणार नाही तर मी ते सिद्धही केले पाहिजे. ती माझी सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे. त्यासाठी त्या भानाचे स्वतःला शक्य असलेले सर्व पुरावे व्यावसायिक भूमिकेतून देणे.म्हणजे मी भारतीय लोकशाही मानतो, वर्ण-जाति-लिंगभेद मानीत नाही.
4. **समाज भानाच्या दिशेने** : माझ्यातील हे भान मी इतरांमध्ये जागविणे म्हणजे समाज भान जागविणे. केवळ मीच माझ्या आत्मभानात मग्न राहाणे पुरेसे नाही, तर माझ्याबरोबर माझे सांगाती म्हणून मला इतरांनाही मी सोबत घेतले पाहिजे. माझी 'समकालीनत्वाची जाणिव' मी त्यांच्यात पोहोचविली पाहिजे. ही माझी नैतिक भूमिका असेल.
5. **संवाद :** माझी 'समकालीनत्वाची जाणिव' इतरांमध्ये प्रवाही करण्यासाठी त्या सह-जनांना समजेल अशा भाषेत मी ती संवादी करणे. याचा अर्थ असा की, या इतरांना त्यांच्या काळाचे भान येईल, असे सर्व प्रयत्न करणे. म्हणजे त्यांना आपल्या सर्वांच्या काळाचे येईल, असे सर्व प्रयत्न करणे. इथे 'त्यांच्या काळाचे' याचा अर्थ 'मी आणि ते' एकाच काळात आहोत, याची जाणीव त्यांच्यात निर्माण करणे. म्हणजेच त्यांनाही समकालीन बनविणे.
6. **संवाद सातत्य :** पुढे त्यांनाही इतरांसाठी संवादी व आशयसमृद्ध बनविणे, त्यांची तशी तयारी करवून घेणे. असे नेहमी करीत राहणे. शक्य असेल तर 'संवादाची रित ' म्हणून प्रस्थापित करणे. मग हा समकालीनांचा प्रवाह बनेल. आपलासर्वांचा दर्जा समान होईल. अस्सल ज्ञानात्मक समता प्रस्थापित होईल. सारेजण समकालीन बनतील. मग, "मी, प्रथम पुरुषी जे काही निर्माण करेन, जी काही माझी

अभिव्यक्ती असेल, माझे व्यक्त होण्याचे माध्यम असेल ते सारे लेखन ,कला ,संगीत ,नाट्य इत्यादी इतर समकालीनांच्या आकलनाच्या कक्षेत येईल. असे अन्य अभिव्यक्तीच्याही बाबतीत घडेल ".

7. **जाणिवेची पक्कता :** या काळाशी मी संवादी असणे, इतरांना संवादात सहभागी करून घेणे, सर्वचजण संवादाच्या एकाच पातळीवर येणे ही 'समकालीनत्वाची जाणिव' पक्क होण्याची अवस्था असेन. 'समकालीनत्वाची जाणिव' ही सामाजिक घटना आहे.

## समकालीनांपुढील आव्हान : मूल्याधिष्ठित जाणिव



प्राचीन काळापासून जनसामान्यामध्ये पुराणे आणि दर्शने प्रभावी ठरली. त्यांच्यात सुव्यस्थित फरक करणे, ती अलग करणे हे काम झाले नाही. सतत त्यांच्यात सरमिसळ होत राहिली. परिणामी पुराणातील संकल्पना कोणती आणि दर्शनातील संकल्पना कोणती हे नेमके न कळल्यामुळे दर्शनेच पुराणे म्हणून पुढे आली. त्यात युग कल्पना ठाशीव झाली.

जन्म, पुनर्जन्म, आत्मा, कर्मसिद्धान्त, पापपुण्य, स्वर्ग-नरक या संकल्पना सामान्य लोकांच्या जीवनाचा भाग बनल्या. गांधींपर्यंत अनेकांनी वेदान्त, गीता, इत्यादी संत वचने प्रमाण मानल्याने या साऱ्या संकल्पना म्हणजे 'समकालीन' त्वाला मोठी बाधा ठरली आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण भारतीय माणूस एकाच कालखंडात वेगवेगळे जीवन जगत असतो. " मते समकालीन हे त्या त्या समाजाच्या भूगोलाबरोबर आणि त्या त्या समाजातल्या आर्थिक आणि सामाजिक विभागण्यांबरोबर बघायला पाहिजे. एका काळामध्ये जगत असणाऱ्या निरनिराळ्या सामाजिक आणि आर्थिक अवकाशांतल्या, निरनिराळ्या राजकीय अवकाशांतल्या लोकांच्या धारणा आणि समजुती या वेगवेगळ्या असणार. विशेषतः भारतासारख्या देशामध्ये ज्या ठिकाणी अनेक काळामध्ये समाज एकत्रित जगतो आहे - आदिवासींपासून ते आत्ता आधुनिकोत्तर काळापर्यंत; त्यात एकमेव अशी जाणीव आहे असं म्हणण्याला काही अर्थच नाही. त्याप्रमाणे अमेरिका, भारत, इंग्लंड, जपान आणि सीरियामधले पोस्टमॉडर्न हेही काही समकालीन किंवा एका जाणीवेचे असं म्हणण्याला अर्थ नाही."[16]

"एखादा विशिष्ट प्रांत, समूह, अवकाश हे उरलेल्या अवकाशापासून आणि समजुतींपासून आणि धारणांपासून वेगळे असणार; आत्ताही आहेत. अशा विविध धारणा आहेत याची जाणीव ज्याला आहे तो आत्ताचा समकालीन आहे. परंतु उघडपणे सगळे असे असणार नाहीत, कारण मग वेगवेगळ्या धारणा उरणार नाहीत. ही एक कॅच ट्वेंटी टू सिच्युएशन आहे"[17], असे मत प्रसिद्ध लेखक मकरंद साठे व्यक्त करतात.

इथे एक माझ्या मते, वेगळाच पेच आहे. तो असा की, विद्यमान विषम स्थिती आणि त्यातील माणसे, घटना यांना लेखांचे, लेखनाचे आशयद्रव्य म्हणून वापरायचे की ती स्थिती बदलायची ? हा नैतिक निवडीचा भाग आहे. म्हणजे असे की मला जर इतरांना समकालीन बनवायचे असेल, त्यांना माझ्याशी सुसंवादी करावायचे असेल तर त्यांना त्यांच्या आहेत त्या स्थितीशील वास्तवातून बाहेर काढले पाहिजे. पण मग, माझे लेखनाचे आशयद्रव्य हरपेल. जर आशयद्रव्य टिकवायचे असेल तर ते समकालीन होणार नाहीत, मी एकटाच समकालीन राहील. त्यावेळी मला रसिक, वाचक, परीक्षक लाभणार नाहीत. मी जर

आशयद्रव्य आहे तसेच टिकवून मीच एकटा समकालीन बनलो तर ते क्रूर होईल ! मग 'समकालीनतेचा प्रवाह' गतिमान राहणार नाही. सामाजिक सुधारणा होणार नाही.

याचा अर्थ असा की, मी माझा समकालीन राहणार नाही. कारण मी समकालातील मूल्यव्यवस्था अमलात आणीत नाही ! ती आणायची तर 'समकालीन असणे' ही सर्वांचा सहभाग असणारी सामाजिक व्यवस्था मला प्रवाहित करणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे.

ही मांडणी कोणत्याही काळात लागू पडेल, ही तिची शक्ति आहे. तिचे ते स्वरूप आहे. या मांडणीत आणखी सुधारणा करता येतील, याची मला जाणीव आहे. मी ही केवळ प्रस्तावना करीत आहे. ही मांडणी खुली आहे.



---

[1] Dictionary.com, http://dictionary.reference.com/browse/contemporary December 22, 2015.

[2] The Free Dictionary by FARLEX, thefreedictionary.com, http://www.thefreedictionary.com/contemporary, December 22, 2015.

3 मराठी शाब्दबंध (Marathi Wordnet) http://www.cfilt.iitb.ac.in/wordnet/webmwn/wn.php

[4] साळुंखे, आ .ह. 'युग' ही नोंद, खंड १४, मराठी विश्वकोश, https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand14/index.php/component/content/article?id=10057

[5] अहुर मज्द हे इस्लामचा उदय होण्यापूर्वीच्या इराणमध्ये उदय पावलेल्या एका धर्मातील ईश्वराला दिलेले नाव आहे. 'अहुर' म्हणजे सर्व शक्तिमान आणि मज्दा म्हणजे प्रज्ञान, https://en.wikipedia.org/wiki/Ahura_Mazda December 22, 2015.

[6] साळुंखे, आ .ह. 'युग' ही नोंद, खंड १४, मराठी विश्वकोश, https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand14/index.php/component/content/article?id=10057

[7] उदाहरणार्थ, पं. माधव प्रसाद पुरोहित (टीकाकार), सूर्यसिद्धान्त, व्रज जीवन प्राच्यभारती ग्रंथमाला, चौखम्बा संस्कृत प्रतिष्ठान, दिल्ली, तृतीय संस्करण २००० ई. , संगमनेर महाविद्यालय, संगमनेर क्र. ५१४६६/ २३.०९.२०११.

[8] भिषग्वर्य वेदशास्त्रसंपन्न कृष्णशास्त्री नवरे (मराठी भाषांतरकार) , श्री कमलाकर भट्ट विरचित 'निर्णयसिंधु', किंमत रु. २००, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर ग्रंथ क्र. ३२.

[9] काशीनाथ शास्त्री उपाध्याय (मराठी भाषांतरकार), धर्मसिंधु संपूर्ण मराठी भाषांतर, प्रकाशक – राजेश रमेश रघुवंशी, राजेश प्रकाशन, २६, गिरीजा सोसायटी, एम. आय. टी. कॉलेज रोड, पुणे ४११ ०३८. किंमत रु. ३००/-, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर ग्रंथ क्र. ३३.

[10] साळुंखे, आ .ह. 'युग' ही नोंद, खंड १४, मराठी विश्वकोश, https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand14/index.php/component/content/article?id=10057

---

[11] या युग संकल्पनेचा संदर्भ देण्यात आणि अधिक विस्तार करण्यात वेळ आणि जागा घालविण्यात अर्थ नाही. शिवाय तिच्यात बरीच इतर गुंतागुंत आहेच !

[12] साळुंखे, आ .ह. 'युग' ही नोंद, खंड १४, मराठी विश्वकोश, https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand14/index.php/component/content/article?id=10057

[13] साळुंखे, आ .ह. 'युग' ही नोंद, खंड १४, मराठी विश्वकोश, https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand14/index.php/component/content/article?id=10057

[14] काणे पां. वा., ''धर्मशास्त्राचा इतिहास', अनुवाद : यशवंत आबाजी भट पूर्वार्ध, प्रकरण ९३, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ,मुंबई.

[15] सतीश तांबे, 'समकालीन : एक मुलाखत'- संवाद, *संकल्पनेसंदर्भात*, "ऐसी अक्षरे", दिवाळी अंक २०१५, http://aisiakshare.com/node/4553

[16] मकरंद साठे: 'समकालीन : एक मुलाखत' - संवाद, *संकल्पनेसंदर्भात*, "ऐसी अक्षरे", दिवाळी अंक २०१५ http://www.aisiakshare.com/node/4563

[17] मकरंद साठे : 'समकालीन : एक मुलाखत' - संवाद, *संकल्पनेसंदर्भात*, "ऐसी अक्षरे", दिवाळी अंक २०१५ http://www.aisiakshare.com/node/4563